## परिपत्रक

क्रमांक सीएलआर १९८६/२/२३९८१/पंधारा  मुंबई १२ जून ८६

महाराष्ट्र देशी दारु नियम १९७३मधील नियम २१मधील तरतुदीनुसार देशी दारुच्या होलसेल विक्रीची [सी-एल २]दुकाने आयुक्तांनी परवानगी दिल्याशिवाय सकाळी ९ ते सायंकाळी ५या वेळाव्यतिरिक्त उघडी ठेऊ नयेत असे बंधन आहे. तथापि वरील नियमांतील तरतुदीनुसार सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळात ही दुकाने उघडी ठेवलीच पाहिजेत असे बंधन अनुज्ञप्तीधारकावर येत नाही. वास्तविक या दुकानाचे व्यवहार ठराविक वेळात पार पाडले जावेत व होलसेल विक्रीच्या अनुज्ञप्तीधारकांकडे येणाऱ्या संबंधितांच्या कामात अडचणी येऊ नयेत या दृष्टीकोनातून व अशा अनुज्ञप्तींची तपासणी करताना अनुज्ञप्ती उघड्या असाव्यात या दृष्टीकोनातून वरील नियमाची तरतूद केली असल्याने देशी दारु विक्रीची [सीएल २]सर्व दुकाने शासनमान्य सुट्टीचे दिवस वगळून इतर दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५वाजेपर्यंत उघडी ठेवावीत. सर्व जिल्हा अधीक्षकांनी त्यांच्या जिल्ह्यातील सर्व सीएल २ अनुज्ञप्तीधारकांच्या नजरेस वरील आदेश आणून द्यावेत.

[म. ब. चौबे]
आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१]उप आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क[निरीक्षण][दक्षता]
२]सर्व जिल्हाधिकारी यांना सादर.
३]सर्व जिल्हा अधिक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४]आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
५]अभिलेख कक्ष[तीन प्रतीसह]